महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ 02 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 246 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



## ड्रग्स केसमध्ये कोणताही पोलीस अधिकारी आढळल्यास

# निलंबन नव्हे; थेट बडतर्फ

**महाराष्ट्राचे पोलीस दल देशातील सर्वोत्तम पोलीस दल म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र देशात औद्योगिक दृष्ट्या क्रमांक एकवर येण्यातही पोलीस विभागाचे योगदान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र पोलीस दलाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्र पोलीस दलाची कामगिरी "बेंचमार्क" म्हणून पाहिली जाते. ही ओळख कायम टिकविण्यासाठी पोलिसांनी अधिक जबाबदारीने अधिक पारदर्शकतेने काम करणे आवश्यक आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याचा अमली पदार्थाच्या गुन्ह्यात सहभाग आढळून आला तर त्याला बडतर्फ केले जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना दिली.ठाणे शहरात आयोजित केलेल्या ३५ वी महाराष्ट्र राज्य पोलिस क्रीडा स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी उपस्थिती लावली. या कार्यक्रमापुर्वी त्यांनी राज्यातील गुन्हे आणि कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी रेमंड गेस्ट हाऊसमधील कम्युनिटी हॉलमध्ये राज्यातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्यासह इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित आहेत.

पुणे येथील तरुणावरील लैंगिक अत्याचार प्रकरण, महिला सुरक्षा, बीड येथील सरपंचाची हत्या, राज्यातील ढासळलेली कायदा सुव्यवस्थेचे प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर हि विशेष बैठक पार पडली आणि त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना महत्वाच्या सुचना केल्या. या बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधत बैठकीत झालेल्या चर्चेची माहिती दिली. राज्यात सायबर गुन्हे रोखण्यासाठी एक मजबूत महासायबर प्लॅटफार्म तयार करण्यात आला असून त्याचे बैठकीत सादरीकरण झाले. महिलांवरचे अत्याचार, बालकांवरचे अत्याचार अशा गुन्ह्यांचे अतिशय कमी वेळेत आरोपपत्र कसे जाईल, यावर चर्चा झाली. अमली पदार्थ विरोधात कारवाई कशी सुरू आहे आणि पुढे कशाप्रकारे कारवाई केली पाहिजे, यावर देखील चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. उद्योगांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये या दृष्टीने काय करता येईल, यावरही चर्चा झाली. अमली पदार्थाबाबत शुन्य सहनशीलता धोरण राबविले जात आहे. त्यामुळे अमली पदार्थाच्या गुन्ह्यात कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याचा सहभाग आढळून आला तर त्याला बडतर्फ केले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. केंद्र सरकारने जो नवीन कायदा तयार केला आहे. त्यात शक्ती कायद्यातील अनेक गोष्टी अंतर्भुत केल्या आहेत. त्यांचा पुन्हा आढावा घ्यावा लागेल, असेही ते म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणी पोलिस सुरवातीपासून कठोर तपास करीत आहेत. संपूर्ण पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. उज्वल निकम यांना नेमले आहे. त्यामुळे आरोपींना कठोरता कठोर शिक्षा मिळावी असा प्रयत्न राहणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले



### मुख्यमंत्र्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे

- एकूण 18 क्रीडा प्रकाराच्या या स्पर्धेत 2 हजार 929 खेळाडूंनी सहभाग घेतला. पोलीस विभागातील खेळाडूंना ही एक चांगली संधी या माध्यमातून उपलब्ध झाली. यापुढेही जास्तीत जास्त पोलीस खेळाडूंनी अशा स्पर्धांमध्ये आवर्जून भाग घ्यावा.
- महिला खेळाडूंचा लक्षणीय सहभाग, त्यांचे विशेष अभिनंदन. महाराष्ट्राचे पोलीस दल देशातील सर्वोत्तम पोलीस दल म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र देशात औद्योगिक दृष्ट्या क्रमांक एकवर येण्यातही पोलीस विभागाचे योगदान महत्त्वाचे.
- महाराष्ट्र पोलीस दलाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्र पोलीस दलाची कामगिरी "बेंचमार्क" म्हणून पाहिली जाते. ही ओळख कायम टिकविण्यासाठी पोलिसांनी अधिक जबाबदारीने अधिक पारदर्शकतेने काम करणे आवश्यक.
- जशी खेळात संघभावना जोपासली जाते तशीच दैनंदिन कामकाजातही ही संघभावना जोपासायला हवी. पोलीस खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर समावेश होण्यासाठी खेळातील कामगिरी त्या दर्जाची करावी.

## आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते

# 'परिवहन भवन' चे भूमिपुजन

### – परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

२ मार्चला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते "परिवहन भवना " चे भुमिपुजन-- परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांची माहिती मुंबई: (१ मार्च ) परिवहन विभागाचे (RTO ) मुख्यालय असलेल्या " परिवहन भवन " या नव्या इमारतीचे भूमिपूजन २ मार्च रोजी दुपारी २ वाजता सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार व श्री. एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

रस्ते वाहतुकीची नियमन करण्यासाठी १ मार्च १९४० ला तत्कालीन मुंबई राज्याचा परिवहन विभाग अस्तित्वात आला. त्यामुळे १ मार्च हा दिवस " परिवहन दिन " म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची औचित्य साधून या रविवारी सर पोचखानवाला मार्ग वरळी, मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते ४ मजली प्रशस्त अशा " परिवहन भवन " या इमारतीचे भूमिपूजन संपन्न होत आहे.

सुमारे १२८०० चौरस मीटर बांधकाम क्षेत्र असलेल्या या इमारतीमध्ये एकावेळी १५० चारचाकी वाहने उभी करता येतील, इतकी चार मजल्याची भूमिगत पार्किंग व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. हि इमारत पुढील अडीच वर्षांत बांधून पूर्ण केली जाणार आहे. विशेष म्हणजे राज्याला दरवर्षी १५ हजार कोटी रुपये महसूल मिळवून देणाऱ्या या विभागाच्या मुख्यालयाला स्वतः ची इमारत नव्हती. परिवहन विभाग स्थापन झाल्यापासून तब्बल गेली ८५ वर्ष या विभागाचे मुख्यालय भाड्याच्या इमारतीमध्ये होते. परिवहन मंत्री म्हणून प्रताप सरनाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर परिवहन विभागाच्या पहिल्या बैठकीमध्ये परिवहन विभागाच्या मुख्यालयाची स्वतःची इमारत बांधण्याचा संकल्प सोडला. एवढंच नाही तर त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते " परिवहन भवन " या परिवहन विभागाच्या मुख्यालयाचे येत्या रविवारी भुमिपुजन होत आहे.

# आजपासून एलपीजी सिलिंडर महाग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सरकारने आज गॅससिलेंडरच्या दरात मोठी वाढ केली आहे. आज शनिवारी १ मार्च रोजी एलपीजी सिलिंडरचे नवे दर जाहीर करण्यात आले आहेत. एलपीजीच्या (लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस) नव्या दरानुसार अर्थसंकल्पाच्या दिवशी मिळालेला दिलासा आज काढून घेत सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा धक्का देण्यात आला आहे. आज पासून १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

आज दिल्लीते मुंबईपर्यंत ही दर वाढ लागू करण्यात आली आहे. तब्बल ६ रुपयांनी हा सिलिंडर महागला आहे. मात्र, व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या मार्चमहिन्यातील किमतीचा कल पाहिला तर १ मार्च रोजी झालेली वाढ ही गेल्या ५ वर्षांतील सर्वात कमी वाढ आहे. इंडियन ऑईल पोर्टलवरील आकडेवारीनुसार, मार्च २०२३ मध्ये व्यावसायिक किंमती सर्वाधिक वाढल्या, जेव्हा किंमती एका झटक्यात ३५२ रुपयांपर्यंत वाढल्या. अर्थसंकल्पाच्या दिवशी एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ७ ते १९ रुपयांनी कपात करण्यात आली. १ ऑगस्ट २०२४ पासून घरगुती गॅस सिलिंडर म्हणजेच १४ किलोएलपीजी सिलिंडरच्या किंमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

इंडियन ऑईलने जाहीर केलेल्या ताज्या दरानुसार, १ फेब्रुवारीपासून दिल्लीत १९ किलोएलपीजी सिलिंडरची किंमत १८०३ रुपये झाली आहे. यापूर्वी फेब्रुवारीत तो १७९७ रुपये आणि जानेवारीत १८०४ रुपये होता. कोलकात्यात हाच व्यावसायिक सिलिंडर आता १९१३ रुपयांना मिळणार आहे. फेब्रुवारीत तो १९११ रुपयांवरून १९०७ रुपयांवर आणण्यात आला.

थोडक्यात महत्वाचे

## शाळा प्रांगणातील हिरकणी कक्षात ओली पार्टी ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महापालिका शाळा प्रांगणातील हिरकणी कक्षातील ओली पार्टीची तक्रार महापालिकेकडून मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दिली. याबाबत तपास सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे यांनी दिली असून शहरांत ठेवण्यात आलेले बहुतांश हिरकणी कक्ष बेवारस व कुलूप बंद असल्याचे चित्र आहे. उल्हासनगर कॅम्प नं-३, फॉरवर्ड लाईन चौक परिसरातील महापालिका शाळा क्रं-२९ व ८ मधील आवारातील हिरकणी कक्षात ओली पार्टी झाल्याचे उघड झाले. याप्रकरणी एकच खळबळ उडाली असून मध्यवर्ती पोलीस ठाण्यात याबाबत महापालिकेकडून तक्रार देण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे यांनी महापालिकेकडून तक्रार आल्याचे सांगून तपासाअंती गुन्हा दाखल करणार असल्याचे म्हणाले. शनिवारी शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्यात आले असून शाळा आवारातील तीन पैकी दोन हिरकणी कक्ष आजपर्यंत लॉकबंद आहेत. तर ज्या हिरकणी कक्षात ओली पार्टी झाल्याचे उघड झाले, त्या कक्षाचे दरवाजे तुटलेल्या स्थितीत आहेत.

महापालिका मुख्यालय, प्रभाग समिती कार्यालय, पोलीस ठाणे आदी ठिकाणच्या हिरकणी कक्षाचा एकदाही वापर झाला नसल्याची माहिती उघड झाली. गेल्या वर्षापासून बहुतांश हिरकणी कक्षाचा वापर झाला नसल्याने, त्यांची दुरावस्था झाली आहे. महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी शाळेतील प्रकाराबाबत नाराजी व्यक्त करून याप्रकरणी कारवाईचे संकेत दिले. तर उपायुक्त अजय साबळे यांनी शाळा क्रं-२९ व ८ मध्ये सुरक्षारक्षक तैनात करून सर्वच शाळेतील सिसिटीव्ही कॅमेरे बसाविण्यात येणार असल्याची माहिती दिली. यापूर्वीही लोकसभा निवडणूक वेळी याच शाळेत विनपरवाना शिलाई मशीनचा साठा ठेवून महिलांना वाटप केल्या होत्या. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला होता.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी दहा मार्च पर्यंत मुदत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** आरटीई अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतू, ठाणे जिल्ह्यातून निवड झालेल्या १० हजार ४२९ विद्यार्थ्यांपैकी केवळ ५ हजार ११३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश घेतलेला नाही. ज्या विद्यार्थ्यांचा अद्याप प्रवेश निश्चित झालेला नाही, त्यांना १० मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती आरटीईच्या संकेतस्थळावर उपलब्ध झाली आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ साठी १४ जानेवारीपासून सुरुवात झाली. १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील २५ हजार ७७४ विद्यार्थ्यांचे आरटीई प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १० हजार ४२९ विद्यार्थ्यांची आरटीई प्रवेशासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेश निश्चित करण्यासाठी २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतू, ठाणे जिल्ह्यात २८ फेब्रुवारीपर्यंत केवळ ५ हजार ११३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असल्याची माहिती आरटीईच्या संकेतस्थळावरील अहवालातून स्पष्ट होत आहे. त्यामुळे आरटीई प्रवेशाकडे पालकांनी पाठ फिरवली का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तर, आरटीई प्रवेशासाठी निवड झाल्या संदर्भात आणि प्रवेश निश्चित करण्याची माहिती पालकांना दुरध्वनी संदेशाद्वारे दिली जाते.

या संदेशाकडे पालकांचे दुर्लक्ष होत असून त्यामुळेच अद्याप काही विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले नाही असा दावा शिक्षण विभागाकडून करण्यात आला. त्यामुळे पालकांना प्रवेशासाठी आणखी वेळ मिळावा याकरिता प्रवेश घेण्याची तारिख वाढविण्यात आली आहे. यासंदर्भातील, माहिती आरटीईच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आता, १० मार्च पर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

## उद्यापर्यंत मुंडेंचा राजीनामा घ्या; अन्यथा तीव्र आंदोलन – अंजली दमानियांचा जाहीर इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हाच सूत्रधार असल्याचे पोलिसांनी दाखल केलेला आरोप पत्रातून समोर आले आहे. अॅट्रॉसिटी, खंडणी आणि हत्या या तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख आरोपपत्रातून करण्यात आला आहे. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड तयार होतील, असे त्यांनी म्हटले आहे. तर सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू, असा जाहीर इशारा देखील त्यांनी दिला आहे.

अंजली दमानिया पत्रकार परिषदेत म्हणाल्या की, आज चार्जशीट दाखल झालेली आहे. धनंजय मुंडे यांना कराडला वाचवायचे होते, यासाठी वेगवेगळे गुन्हे दाखल केले. 6 तारखेला जी मारामारी झाली, त्यानंतर सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांचे बोलणे झाले. धनंजय मुंडे य ांच्य ास ार ख ी माणसे राजकारणात असली तर अ न े क वाल्मिक कराड तयार होतील. 10 वर्ष या सर्वांचे सिंडीकेट होते, असा आरोप त्यांनी केला.



अंजली दमानिया पुढे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांना बडतर्फ करावे. वाल्मिक कराड हाच खरा य ात सूत्रधार होता. सातपुडा येथे बैठक झालेली होती. बीडमध्ये 107 अधिकाऱ्यांनी बदली करून घेतली. जर सोमवारपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू. धनंजय मुंडे यांचे अस्तित्व कराडमुळेच आहे. या प्रकरणात राजकीय दबाव होता. ते उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे असल्यानेच हे घडले, असा हल्लाबोल त्यांनी केला आहे.

# एकाच महिन्यात ठाण्यातील टायर किलरचा फज्जा!



**टायर किलरमुळे विरुद्ध दिशेने वाहने चालविणाऱ्यांवर अटकाव झाला होता. परंतु अवघ्या महिन्यरातच टायर किलरमधील खाली-वर होणारे सुळे बंद पडले आहे. त्यामुळे आता या टायर किलरची अवस्था गतिरोधकाप्रमाणे झाली आहे. अवघ्या महिन्याभरातच टायर किलर बंद पडल्याने टायर किलर यंत्राविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. टायर किलरमधील स्प्रिंग खराब झाल्याने कंत्राटदाराला ते टायर किलर पुन्हा बसविण्यास सांगण्यात आल्याचे एका वाहतुक पोलीस अधिकारीने नाव छापू नये या अटीवर सांगितले.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना अटकाव करण्यासाठी ठाणे महापालिका आणि पोलिसांनी गाजावाजा करुन बसविलेले टायर किलर वाहनांचे चाके पंक्चर करण्याऐवजी ते टायर किलरच पंक्चर झाले आहे. मागील काही दिवसांपासून या टायर किलरमधील सुळयासारखे यंत्र काम करत नाही. त्यामुळे या टायर किलरचे रुपांतर आता गतिरोधकात झाले आहे. ठाण्यात इतर भागात देखील असे टायर किलर बसविण्याचा प्रयत्न ठाणे महापालिका आणि वाहतुक पोलिसांचा होता. परंतु आता पहिलाच प्रयोग फसल्याचे दिसून येत आहे. ठाणे शहराला वाहतुक कोंडीने ग्रासले आहे. ठाणे स्थानक परिसरातून हजारो वाहने ठाणे शहरातील विविध भागात वाहनाने जात असतात. रिक्षा आणि इतर व्यवसायिक वाहनांचा भारही या मार्गावर अधिक असतो. शहरात अनेक असे भाग आहेत. ज्या ठिकाणी वाहन चालक विशेषत: रिक्षा चालक आणि दुचाकी चालक विरुद्ध दिशेने वाहतुक करतात. शहरातील वाहतुक समस्येविषयी तोडगा काढण्यासाठी सप्टेंबर २०२४ मध्ये ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव आणि वाहतुक पोलीस अधिकाऱ्यांची एक बैठक महापालिकेत झाली होती. या बैठकीत वेगवेगळ्या वाहतुक समस्ये विषयी चर्चा झाली. त्यात विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांना अटकाव करण्यासाठी टायर किलर बसविण्याचा मुद्दा उपस्थित झाला होता. वाहतूक पोलिसांनी निश्चित केलेल्या ठिकाणी हे टायर किलर बसविण्यात येणार होते. त्यानुसार सुमारे महिन्याभरापूर्वी ठाणे स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराज पथ येथे मो.ह. विद्यालयापासून काही मीटर अंतरावर प्रायोगिक तत्त्वावर टायर किलर बसविण्यात आले होते. या टायर किलर विषयी नागरिकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया होती. ठाण्यात हा पहिलाच प्रयोग असल्याने वाहन चालक चाकाचे नुकसान होईल या भितीने वाहने हळू चालवित होते. तर काही पादचारी टायर किलरवरुन जाताना जखमी झाले होते.



# गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

श्रीभगवानुवाच बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन । तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ॥ ४-५ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे परंतपा (अर्थात शत्रुतापना) अर्जुना, माझे आणि तुझे पुष्कळ जन्म झालेले आहेत. ते सर्व तुला माहीत नाहीत, पण मला माहीत आहेत. ॥ ४-५ ॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् । प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया ॥ ४-६ ॥

मी जन्मरहित आणि अविनाशी असूनही तसेच सर्व प्राण्यांचा ईश्वर असूनही आपल्या प्रकृतीला स्वाधीन करून आपल्या योगमायेने प्रकट होत असतो. ॥ ४-६ ॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४-७ ॥

हे भारता(भरतवंशी अर्जुना), जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास आणि अधर्माची वाढ होत असते, तेव्हा तेव्हा मी आपले रूप रचतो म्हणजेच आकार घेऊन लोकांसमोर प्रकट होतो. ॥ ४-७ ॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ४-८ ॥

सज्जनांच्या उद्धारासाठी, पापकर्म करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची उत्तम प्रकारे स्थापना करण्यासाठी मी युगायुगात प्रगट होतो. ॥ ४-८ ॥

# जीवनदीप महाविद्यालय गोवेली
# माजी विद्यार्थी संघामार्फत विशेष उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघामार्फत पदवी आणि पदव्युत्तर पदवी मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्याचा एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षांपासून हा उपक्रम माजी विद्यार्थी संघामार्फत राबविला जात आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. बी. कोरे सर, उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे सर यांचे विशेष मार्गदर्शन तथा सहकार्य लाभले. माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते मागील वर्षात पदवी आणि पदव्युत्तर पदवी मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे विद्यार्थी प्रतिनिधी श्री. बाळू फुलारे तसेच समन्वयक प्रा. जया देशमुख मॅम, सहसमन्वयक प्रा. रुची शुक्ला मॅम, प्रा. विजय सोनार सर आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ‘सुवास रातराणीचा’ या कथासंग्रहांचे प्रकाशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: डॉ. यशवंत सुरोशे लिखित अनघा प्रकाशनाचे ‘सुवास रातराणीचा’ या कथासंग्रहांचे जेष्ठ समीक्षक डॉ. सतीश बडवे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. प्रकाशनाचा हा कार्यक्रम 'मराठी भाषा गौरव दिनाच्या' निमित्ताने वरिष्ठ महाविद्यालय, शिवळे ता. मुरबाड या महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए. बडगुजर होते. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांचे अनुदान प्राप्त 'सुवास रातराणीचा' या कथासंग्रहाविषयी समीक्षात्मक मांडणी करताना डॉ.बडवे यांनी लेखक आपल्या आजुबाजुचा भवताल अत्यंत संवेदनशीलपणे मांडतो. यातील बहुतेक कथा



स्त्रीयांच्या दुःखाची, संघर्षाची मांडणी करतात. लेखक आपल्या अर्पण पत्रिकेतूनच स्त्रीविषयक आपली भूमिका मांडतांना दिसतो. काही कथा विनोदी धाटणीच्या आहेत हे विशेष! काही कथांमध्ये पुरुष नायकही एका निर्णायक भूमिकेत दिसून येतात. समस्यांची मांडणी करताना काही कथांमधील नायक कधी नामोहरम होतो तर कधी प्रश्न सोडून देतो. मात्र काही कथेतील स्त्री धीटपणे वागते. निर्णयापर्यंत येते. समस्येवर उपाय शोधते हे विशेष! सूक्ष्म निरीक्षण, व्यक्तीच्या अंतरंगात डोकावण्याची किमया आणि संवादयुक्त भाषाशैली ही लेखकाची बलस्थाने आहेत, असे प्रतिपादन डॉ. बडवे यांनी केले. भविष्यात लेखकाने समस्यांच्या मुळाशी जाणारे आणि समाजाला काही दिशा देणारे लेखन करावे असेही मत मांडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पुजन करून इशस्तवन सादर झाले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय चिताळकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. लेखक डॉ. यशवंत सुरोशे यांनी सुवास रातराणीचा या कथासंग्रहाचा लेखन प्रवास थोडक्यात सांगितला. कार्यक्रमासाठी अनघा प्रकाशनाचे प्रकाशकही उपस्थित होते. मराठी भाषेचे अभिजात असणे आणि ते पुढे टिकवण्यासाठी नव्या लेखकांना पुढे आणणे आवश्यक आहे असे त्यांनी आपल्या मनोगतातून मांडले. प्रा. डॉ. विनोद पाटील यांनी सर्वाचे आभार मानले तर संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन श्री. मधुकर पवार यांनी केले.

# लहान बालिकेचे अपहरण ; आरोपीला अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : दिनांक २७ मार्च २०२५ रोजी २८ वर्षीय महिला रा. संजय गांधी नगर वाडा यांनी रात्री ९ च्या सुमारास वाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली की, त्यांची ८ वर्षीय मुलगी कोणीतरी अज्ञात इसमांनी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत. ती राहत असलेल्या संजय गांधी नगरातून खेळत असताना. खाऊचे अमिश दाखवून पळवून नेली. व त्या अज्ञात इसमांचे वर्णन सविस्तर सांगितले.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून. वाडा पो. ठाणे प्रभारी पो. अधिकारी यांनी. या संदर्भात सुचना देऊन. जनसंपर्क अभियान अंतर्गत सर्व व्हाट्अप गृप वर सदर मुलीचे फोटो व अज्ञात इसमांचे



वर्णन संदर्भात संदेश - मेसेज पाठवत, मुलीचा व इसमांचे शोध घेण्यासाठी आवाहन करण्यात आले.

मुलगी खेळत असलेल्या परिसरातील दुकानदार / नागरिक यांच्या कडे चौकशी करीत परिसरात असलेले लावण्यात आलेले सि.सि.टि.व्ही. कॅमेरे तपासणी केली असतांना. सदर इसम गुरुनाथ उर्फ डेव्हिड महादू मुकणे रा. देसई येथील असल्याचे समजून आले. व तो ऐनशेत गावातून मुलीला घेऊन

## पोलिसांची यशस्वी कामगिरी

जात असल्याची माहिती जनसंपर्क अभियानात अंतर्गत मिळून आली. संशयित इसमाच्या त्याच्या घरी शोध असताना तो तेथे आढळून आला नाही. यामुळे ऐनशेत परिसरात शोध घेत असताना. पहाटे ५ च्या दरम्यान शास्त्रीनगर परिसरातून लपतछपत जात असल्याचे आढळून आले. त्यावेळी पोलीसांनी लागलीच त्याला अचानक पणे झाडप घालून मुलीसह ताब्यात घेतले.

त्यानंतर त्यांना पोलीस ठाण्यात आणून आरोपी वर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.। ९० / २०२५ , भारतीय न्याय संविधान कलम १३७ ( २ ) प्रमाणे गुन्हा करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास, तपासी अधिकारी वाडा पोलीस करीत असून अपहरण केलेल्या मुलीला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले आहे.

जनसंपर्क अभियानांतर्गत करण्यात आलेल्या जनजागृती मुळे शक्य झाले आहे. बाळासाहेब पाटील - पो. अधिक्षक पालघर, विनायक नरळे - अप्पर पो. अधिक्षक पालघर, गणपत पिंपळे - उपविभागीय पो. अधिकारी जव्हार, यांच्या मार्गदर्शनाखाली वाडा पो. ठाणे. प्रभारी पो. अधिकारी दत्तात्रेय किंद्रे - पो. निरिक्षक, व वाडा पो. ठाणे तपासी पथक पो. अधिकारी, अंमलदार यांनी तांत्रिक बाबी तपासून सिसिटिव्ही फुटेज व जनसंपर्क अभियान अंतर्गत जोडलेल्या मानवी साखळीमुळे यशस्वी.

# राज्यात १ हजार २३९ हेक्टरने कांदळवनांमध्ये वाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन वर्षात कांदळवन क्षेत्रात 1 हजार 239 हेक्टरने वाढ झाल्याची माहिती राज्याचे वनमंत्री तथा पालकमंत्री पालघर जिल्हा गणेश नाईक यांनी आज येथे दिली.

ऐरोली सेक्टर 10 येथील जैवविविधता केंद्र जेट्टी ते बेलापूर येथील जेट्टी असा पाहणी दौरा वने मंत्री गणेश नाईक यांनी आज खाडीमार्गे केला. श्री. रामाराव, श्रीमती सावंत, श्रीमती पवार, श्री. गजभिये, श्री. बहादुरे हे कांदळवन विभागाचे वरिष्ठ अधिकारी त्याचबरोबर नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता श्री. अरदवाड आणि युडीडीपी श्री. केकाण हे अधिकारी या पाहणी दौऱ्याप्रसंगी उपस्थित होते.

राज्य शासनाने दिलेल्या 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत हा पाहणी दौरा एक भाग होता. जैवविविधता केंद्राला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. या ठिकाणी पर्यटकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या ठिकाणी



फ्लेमिंगो पक्ष्यांना पोषक असे वातावरण कायम ठेवण्याचा वन विभागाचा प्रयत्न असतो. पूर्वी काही हजारांमध्ये असलेल्या फ्लेमिंगोची संख्या आज दीड लाखाच्या घरात गेली आहे. समुद्राच्या पाण्यावर दिसणारे प्लास्टिक, तेलाचा तवंग, प्रक्रिया न करता सोडण्यात आलेले पाणी स्वच्छ करण्यासाठी उपाय योजना करण्याची सूचना नामदार नाईक यांनी वन अधिकाऱ्यांना केली. त्याचबरोबर या विषयाशी संबंधित उद्योग, पर्यावरण, बंदरे या विभागांबरोबर यानुषंगाने चर्चा करण्याचे निर्देशदेखील दिले.

राज्यात मागील दोन वर्षांमध्ये 1 हजार 239 हेक्टरने कांदळवनाच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे. खारफुटी पुनर्रोपणासारखे कार्यक्रम वनविभाग राबवित आहे. कोस्ट गार्ड तर्फे खाडी किनारी अतिशय आधुनिक उपकरणांसह नियमित गस्त सुरू असते. कांदळवनांचे नुकसान होत नाही ना याकडे बारीक लक्ष ठेवले जाते. त्यामुळे खाडीतील कांदळवने सुरक्षित आहेत. ज्या ठिकाणी कांदळवनांवर अतिक्रमण करण्यात आले आहे, त्या ठिकाणी सुरुवातीला संबंधित घटकांना समजावून सांगण्यात येईल. त्यानंतरही अतिक्रमणे हटवली नाहीत तर मात्र कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे वनमंत्री श्री. नाईक यांनी स्पष्ट केले. प्रवासी आणि मच्छिमारांसाठी दिवाजेट्टी 24 तास वापरण्यायोग्य करण्याचे निर्देश देखील त्यांनी दिले. ऐरोली मध्ये जैवविविधता केंद्र येथे वनविभागाच्या वतीने खारफुटी वूड वॉकची निर्मिती केली जाणार आहे. गोराई येथे अशा प्रकारचा वूड वॉक अगोदरच तयार करण्यात आलेला आहे. लाकडाच्या पुलावरून चालत खारफुटी पर्यटनाचा अनुभव पर्यटकांना घेता येणार आहे. प्लास्टिक मुक्त शहर, प्रदूषणमुक्त वने आणि समुद्र यासाठी जन सहभाग आणि जनजागृतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मराठी भाषा गौरवदिनी बिर्ला महाविद्यालयात काढण्यात आली ग्रंथ दिंडी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बिर्ला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बिर्ला महाविद्यालयामध्ये ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती. या ग्रंथ दिंडीमध्ये पद्मश्री गिरीश प्रभुणे (समाजसेवक), सुबोध दवे उपाध्यक्ष कल्याण सिटीझन एज्यूकेशन सोसायटी, शिक्षण संचालक डॉ.नरेश चंद्र, प्राचार्य डॉ. अविनाश पाटील, रात्रमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .बिपिनचंद्र वाडेकर तसेच कला शाखा उपप्रचार्य डॉ.महादेव यादव तसेच महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने या ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते. भजनी मंडळ आणि लेझीम पथकाच्या मंगलमय वातावरणात ग्रंथदिंडी सोहळा संपन्न झाला. महाविद्यालय परिसरात एक झाड एक कविता या संकल्पने अंतर्गत महाविद्यालय परिसरातील झाडांवर विद्यार्थ्यांनी सुलेखन केलेल्या कविता लावण्यात आल्या होत्या. विद्यार्थी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या ताम्रपट आणि शिलालेख या फलकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**तक्ता - ४ (नियम ८ पहा)**

**दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकात प्रकाशित करावयाचे दै.ठाणे जीवनदीप वार्ता या वृत्तपत्राची मालकी व अन्य तपशिलाबाबतचे निवेदन**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशनाचे स्थळ | : | महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ |
| २) | प्रकाशनाचे स्वरूप | : | दैनिक |
| ३) | मालक / मुद्रक / प्रकाशक | : | श्री. रविंद्र नारायण घोडविंदे |
| | भारताचे नागरिक आहेत काय? | : | होय |
| | पत्ता | : | मु. पोई, पो. वाहोली, तालुका - कल्याण जिल्हा : ठाणे, ४२१३०१ |
| ४) | संपादकाचे नाव | : | श्री. रविंद्र नारायण घोडविंदे |
| | भारताचे नागरिक आहेत काय? | : | होय |
| | पत्ता | : | मु. पोई, पो. वाहोली, तालुका - कल्याण जिल्हा : ठाणे, ४२१३०१ |

**मी श्री.रविंद्र नारायण घोडविंदे याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे खरा आहे**

**सही /-**
**श्री. रविंद्र नारायण घोडविंदे**
**(मालक/मुद्रक/प्रकाशक/संपादक)**

**दिनांक : २ मार्च २०२५**
**ठिकाण : कल्याण**


## रेसिपी
# काळी उडदाची डाळ



**प्रथिनांचा उत्तम स्रोत**

उडदाची डाळ ही वनस्पती-आधारित प्रथिनांचा चांगला स्रोत मानली जाते. उडद डाळ खाल्ल्याने स्नायू आणि चयापचय आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते, जे मधुमेही रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरू शकते.

**पोषक तत्वांचा खजिना**

उडद डाळीमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि इतर अनेक प्रकारची जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात. विशेषतः, मॅग्नेशियम इन्सुलिनच्या प्रकाशनात आणि कार्यात महत्त्वाची भूमिका बजावते. जे मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**अँटिऑक्सिडंट गुणधर्म**

उडद डाळमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात जे ऑक्सिडेटिव्ह ताण नियंत्रित करण्यास मदत करतात. ऑक्सिडेटिव्ह ताण कमी केल्याने मधुमेह नियंत्रित करण्यास देखील मदत होऊ शकते.

**वजन नियंत्रणात उपयुक्त**

उडद डाळीमध्ये प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असल्याने ते वजन नियंत्रित करण्यास मदत करू शकते. वजन नियंत्रित केल्याने टाइप २ मधुमेहाचा धोका देखील कमी होऊ शकतो.

**काळी उडद डाळ कशी खावी?**

8 ते 9 तास भिजवलेले काळे हरभरे सहज पचतात. तुमच्या आहारात काळी उडदाची डाळ समाविष्ट करण्यासाठी, ती भिजवून खावी. उडदाची डाळ खिचडी, चविष्ट आणि पौष्टिकः उडदाची डाळ खिचडी मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे. तसे, उडद डाळ हा एक अतिशय जड आहार मानला जातो. प्रथिने आणि फायबरने समृद्ध असलेली ही खिचडी बनवण्यासाठी कमीत कमी मिरच्या, मसाले आणि तेल वापरावे.

# केडीएमसीच्या आय प्रभागात तोडक कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :

अनाधिकृत बांधकाम प्रश्नी केडीएमसी प्रशासन अँक्टीव्ह मोडवर आले असल्याचे दिसत आहे. केडीएमसी क्षेत्रातील आय प्रभागातील ढोकळी गाव कोहिनूर रोड येथे जाणाऱ्या रस्त्यावरील तळ अधिक तीन मजली अनाधिकृत बांधकाम ओम साई बिल्डर संजय शेळके विकासक यांच्या संदर्भीत अनाधिकृत इमारतीवर आय प्रभागाचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी पाडकाम कारवाई करीत धडक तोडण्याचे काम शनिवारी सुरू केले.

तसेच अडीवली ढोकळी येथील जावेद शेख या विकासकाचे तळ मजला व तळ अधिक एक मजला असे दोन अनाधिकृत बांधकामावर धडक तोडक कारवाई सुरू केली. या प्रसंगी पोकलन, डंपर अनाधिकृत बांधकाम विरोधी पथकाचे कर्मचारी, पोलीस असा फौजफाटा होता. प्रशासनाच्या धडक पाडकाम कारवाई बडग्यामुळे अनाधिकृत बांधकामे भुमाफियांचे धाबे दणाणले असून त्यांची खैर नाही असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.






# श्री दंबाकाली पीठाधीश्वर श्री गौरीश गुरुजी यांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुरबाड :

श्री दंबाकाली मंदिर रानविहीर तालुका शहापूर जिल्हा ठाणे. ,समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री गौरीश गुरुजी यांना श्री दमबाकाली पिठाधीश्वर म्हणून मान्यता मिळाली असून त्यांचा नाशिक येथे सन्मान करण्यात आला आहे. विरक्त साधू समाज नाशिक मंडळ, नाशिक दिगंबर आखाडा तथा श्री पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत डॉ. भक्ती चरणदासजी महाराज नाशिक व इतर साधुसंतांच्या उपस्थितीत गौरीश गुरुजी यांना विधी युक्त पद्धतीने दंबा काळी पिठाधीश्वर म्हणून मान्यता दिली आहे. समाजासाठी असलेली तळमळ विशेषतः. आदिवासी लोकांसाठी त्यांची उन्नती व्हावी या दृष्टीने अनेक उपक्रम राबवून गौरीश गुरुजी हे सतत प्रयत्नशील असतात.

श्रीदंबा काली मंदिर समितीचे विश्वस्त प्रशांत देशमुख, सचिन जी रांजणे, ऋतुराज चौधरी, सुनीलजी सोगीर हे देखील कार्यक्रम या ठिकाणी उपस्थित होते.

गौरीश गुरुजी यांच्या या सन्मानामुळे भक्तजनन मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात देखील गौरीश गुरुजी यांच्या हातून असेच चांगले कार्य घडत राहो यासाठी जनसमुदाय त्यांना जोडला जात आहे.





# अधिकारी तुपाशी; कंत्राटी कर्मचारी उपाशी

## पगारात भेदभाव होत असल्याने सिडको कर्मचाऱ्यांमध्ये संताप




**महिना संपण्यापूर्वी सिडकोच्या कर्मचाऱ्यांचा पगार**

**कंत्राटी कामगार मात्र वेटिंगवर**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**नवी मुंबई :** सिडको भवनामध्ये काम करणारे ३५० कंत्राटी कामगारांना जानेवारी महिन्याचे वेतन २८ फेब्रुवारी उजाडला तरी मिळालेले नाही. सिडकोच्या वरिष्ठांनी कंत्राटदाराला नोटीस देऊन, तोंडी सूचना देऊनही त्याने दोन दिवसांत वेतन देण्याचे आश्वासन पाळलेले नाही. प्रकल्पग्रस्त कंत्राटी कामगारांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली असताना शुक्रवारी दुपारी तीन वाजता सिडकोच्या कायमस्वरुपी काम करणाऱ्या साडेसातशे कर्मचारी आणि तीनशेहून जास्त अधिकाऱ्यांना त्यांच्या मोबाइलवर महिना संपण्यापूर्वीच बँक खात्यात वेतन जमा होण्याचे लघुसंदेश खणखणले. त्यामुळे एकाच इमारतीमध्ये काम करणाऱ्या दोन वेगवेगळया प्रवर्गासाठी होणाऱ्या भेदभावाविषयी संताप व्यक्त होत आहे.

सिडको भवनामध्ये मागील अनेक वर्षे लिपिक, टंकलेखक, वाहक, शिपाई आणि अग्निशमन कर्मचारी अशा कार्यालयीन पदांवर हे प्रकल्पग्रस्त कामगार काम करतात. दोन (१६ जानेवारीला) महिन्यांपूर्वी या कामगारांनी निम्म्या दिवसाचे कामबंद आंदोलन करुन सिडकोच्या उच्चपदस्थांचे लक्ष वेधले. आंदोलनानंतर दुपारच्या बैठकीत मुंबई लेबर युनियनच्या पदाधिकाऱ्यांना सिडकोच्या कार्मिक विभागाने लवकरच भविष्य निर्वाह निधी कंत्राटदार जमा करेल आणि वेतन वेळेवर देऊ असे आश्वासन दिले. मात्र वेळोवेळी आश्वासन देऊन सुद्धा कामगारांना वेळेत वेतन अजूनही मिळू शकले नाही. सिडकोच्या कार्मिक विभागाचा कंत्राटदारावर कोणताही अंकुश न राहिल्याने कंत्राटदार सिडकोच्या नोटीस प्रक्रियेला सुद्धा केराची टोपली दाखवत असल्याने कंत्राटी कामगार संतापले आहेत. लोकसत्ताने याबाबत ठळक वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी यांनी सिडकोचे कार्मिक विभागप्रमुख प्रमदा बिडवे यांच्याकडून वेतनाबाबत बैठक घेऊन माहिती मागवली. मात्र त्यानंतरही कंत्राटदाराने कामगारांना वेतन दिलेले नाही.

> **कंत्राटी कामगारांना वेतन देण्याचे निर्देश संबंधित कंत्राटदार कंपनीला दिले आहेत. वेतन देण्याची प्रक्रिया सुरू आहे.**
>
> ● प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको महामंडळ

# झोपडपट्ट्यांचं शहर !

## नालासोपाऱ्याची नवी ओळख



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** - सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वसई विरार शहरात झोपडपट्ट्याही सर्वाधिक असल्याची बाब समोर आली आहे. मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसनन प्राधिकरणाने केलेल्या सर्वेक्षणात वसई विरार मध्ये २ लाख ३२ हजार १४२ झोपडपट्ट्या आहेत. त्यातील सर्वाधिक १ लाख १९ हजार ७०३ झोपडपट्ट्या या नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार विभागात आहेत.

वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहेत.सरकारी, वनविभाग तसेच पालिकेच्या आरक्षित जागा बळकावून चाळी तयार केल्या जात आहेत. त्यामुळे शहर बकाल बनू लागले आहेत. ठाण्याच्या मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसनन प्राधिकरणाने नुकचे वसई विरार शहरात सर्वेक्षण केले होते. त्यानुसार वसई विरार शहरात २ लाख ३२ हजार १४२ झोपडपट्ट्या आहेत. त्यातील सर्वाधिक म्हणजे १ लाख १९ हजार ७०३ झोपडपट्ट्या या नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार विभागात आहे. त्यापाठोपाठ प्रभाग समिती जी ( २१ हजार ४७४) प्रभाग समिती- ब (२० हजार २१९), प्रभाग समिती ड- आचोळे (१० हजार २४०) प्रभाग समिती- सी( ४ हजार ८६२) एवढ्या झोपडपट्ट्या आहेत. २००१ मध्ये शहराच्या एकूण लोकसंख्येच्या ९ लाख २८ हजार लोकसंख्या ही झोपडपट्ट्यांमध्ये रहात होती असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे झोपडपट्टी अधिनियम १९७१ च्या नियम ४ अ अन्वये एकाही झोपडपट्टीला झोपडपट्टी म्हणून मान्यता देण्यात आलेली नव्हती.

**मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात आठ लाख झोपडपट्ट्या असून, त्यातील सर्वाधिक दोन लाख ३२ हजार झोपडपट्ट्या या एकट्या वसई, विरारमध्ये असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे आता या झोपडपट्ट्यांचा विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वसई, विरारमध्ये आता झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात येणार आहे. ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, उल्हासनगर व पनवेल या आठ महापालिका; तसेच अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान, कर्जत व पालघर या आठ नगरपरिषदा आणि बोईसर ग्रामपंचायत कार्यक्षेत्रांसाठी मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे स्वतंत्र प्राधिकरण नियुक्त करण्यात आले आहे.**

**झोपडपट्टी अधिनियम १९७१च्या नियम ४ अ अन्वये वसई, विरारमधील एकाही झोपडपट्टीला झोपडपट्टी म्हणून मान्यता देण्यात आलेली नाही. मात्र, आता झोपडपट्ट्यांमधील नागरिकांना एसआरए प्रकल्पांतर्गत घरे मिळवून देण्यासाठी महापालिका आणि मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. झोपडपट्टी पुनर्विकास योजने अंतर्गत वसईत एकही प्रकल्प कार्यान्वित नसून, या योजनेबाबत शहरात जनजागृती करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे झोपडपट्टी पुनर्विकास योजना प्राधिकरणाचे अध्यक्ष पारस सोमण यांनी शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत सागितले. तर वसई, विरार झोपडपट्टीमुक्त व्हावे यासाठी प्रयत्न करत असल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सागितले.**

# पर्यावरणविषयक परवानग्यांनां स्थगिती

## ‘वनशक्ती’ची सर्वोच्च न्यायालयात याचिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील २० हजार ते दीड लाख चौरस मीटरपर्यंतच्या सर्वच गृहप्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण आणि वातावरण बदल मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या समितीऐवजी राज्याच्या पातळीवरील पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीकडून मंजुरी घेण्याची अनुमती देणाऱ्या केंद्रीय अधिसूचनेस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे आता अंतिम निर्णय येईपर्यंत अशा गृहप्रकल्पांना केंद्रीय समितीकडूनच पर्यावरणविषयक मंजुरी घ्यावी लागणार आहे किंवा स्थगिती उठण्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने २९ जानेवारी रोजी अधिसूचना जारी करून फक्त दीड लाख चौरस मीटरपुढील प्रकल्पांसाठी केंद्रीय समितीकडून परवानगी बंधनकारक केली होती. उर्वरित सर्व गृहप्रकल्पांना राज्याच्या पातळीवर त्यामुळे परवानग्या मिळणार होत्या. मात्र आता ही अधिसूचना सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भूयान यांच्या खंडपीठाने स्थगित केली आहे. या प्रकरणी २८ मार्च रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

या अधिसूचनेला सर्वोच्च न्यायालयात ‘वनशक्ती’ या संघटनेने आव्हान दिले होते. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेत या अधिसूचनेला स्थगिती दिली आहे. याबाबत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला सर्वोच्च न्यायालयाने नोटिस जारी केली आहे. या अधिसूचनेमुळे शहरातील अनेक प्रकल्प पर्यावरणविषयक परवानगीतून मुक्त झाले आहेत. ही बाब धोकादायक असल्याचे या याचिकेत म्हटले आहे.

# विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मिळणार ’नासा’नुभव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी, तसेच अंतराळविषयक बाबींचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने मुंबईतील नेहरू विज्ञान केंद्राने अत्याधुनिक अशी बस सजवली आहे. या अद्ययावत बसमध्ये जोडण्यात आलेल्या मोठ्या स्क्रीनला स्पर्श करताच अंतराळातील ग्रह, तारे स्क्रीनवर दिसतील. येत्या २ मार्चपर्यंत विद्यार्थ्यांना या बसमधील गंमतीजमती अनुभवायला मिळतील. तसेच, या उपक्रमाअंतर्गत निवडक मुलांना नासा दौऱ्याचीही विशेष संधी दिली जाणार आहे.

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने नेहरू विज्ञान केंद्र आणि आयटीसी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. बसमधील प्रदर्शन आणि प्रयोगशाळेत विज्ञान, खगोलशास्त्र अशा अनेक विषयांतील गंमती विद्यार्थ्यांना अनुभवता येणार आहेत.

तसेच विद्यार्थ्यांनी हाताने रेखाटलेल्या चित्रांची मूळ आकर्षकता कायम ठेवत डिजिटल कलाकृतींमध्ये ती करण्यात आली आहेत. चित्रे स्कॅन केल्यानंतर बसमधील स्क्रीनवर संबंधित चित्रे डिजिटल ‘थ्री डी इंटरॅक्टिव्ह कॅरेक्टर्स’मध्ये पाहता येतात. या बसला फँटसी स्पेसशिप हे नाव देण्यात आले असून आतापर्यंत या बसला ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भेट दिली आहे. लहान मुलांच्या कल्पनाशक्तीला साद घालणाऱ्या या उपक्रमात निवडक मुलांना नासा दौऱ्याची विशेष संधी दिली जाणार आहे. जेणेकरून अंतराळ संशोधनाबाबत त्यांच्या मनात कुतूहल निर्माण होईल. सनफीस्ट डार्क फँटसी या संस्थेने हा कलात्मक उपक्रम राबविला असून विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात येत आहे. यापूर्वीही विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी बंगळुरू, चेन्नई आणि हैदराबादसह दक्षिण भारतातील अन्य शहरांमध्येही हा उपक्रम राबविण्यात आला होता.

# नरेश म्हस्केंचा ‘खासदार आपल्या भेटीला’ उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** वनमंत्री गणेश नाईक यांच्या ठाण्यातील जनता दरबाराच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे (शिंदे) खासदार नरेश म्हस्के यांनी गुरुवारी वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित केलेला ‘खासदार आपल्या भेटी’ला उपक्रमाचे वेगवेगळे राजकीय अर्थ काढले जात असतानाच ‘नाईकांच्या जनता दरबाराशी ही स्पर्धा नाही’, अशी स्पष्टोक्ती त्यांनी पत्रकारांशी बोलताना केली. मी या शहराचा खासदार आहे आणि महिन्यातून किमान एकदा तरी येथील लोकांशी संवाद साधण्यासाठी मी येणार आहे, असेही ते म्हणाले.

वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात आयोजित केलेल्या जनता दरबाराचे वेगवेगळे राजकीय अर्थ काढण्यात आले. भाजपच्या आक्रमक राजकारणाचा हा भाग असल्याचे निरीक्षणही राजकीय वर्तुळात नोंदविण्यात आले. नाईक यांच्या जनता दरबाराला आठवडा उलटत नाही तोच ठाण्याचे शिंदेसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी गुरुवारी वाशी येत ‘खासदार आपल्या भेटीला’ या उपक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी महापालिकेसह वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरिकांशी देखील संवाद साधला. नवी मुंबईतील गावठाणांमधील गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न तसेच सिडको वसाहतींमधील घरांना पाठविण्यात आलेल्या नोटीसा प्रकरणी नागरिकांचे गाऱ्हाणे खासदारांनी यावेळी ऐकून घेतले. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी हा उपक्रम म्हणजे कोणाशीही स्पर्धा नाही, असे सांगितले.




### गणेश नाईक महायुतीचे नेते

> **गणेश नाईक हे आमच्या महायुतीचे नेते आहेत. ठाण्यात येऊन जर ते लोकांचे प्रश्न सोडवत असतील तर त्यांचे स्वागतच आहे. लोकांना सरकार दरबारी, सरकारी कार्यालयांमध्ये खेटे मारावे लागतात ते मारावे लागणार नाहीत. प्रत्येक मंत्र्यांचा असा दरबार झाला तर त्याचा लोकांना फायदाच आहे, असे म्हस्के यावेळी म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुद्धा युती मिळून लढावं अशी कार्यकर्त्यांची आणि मतदारांची अपेक्षा असते. आमची युती म्हणून पण लढण्याची तयारी आणि वेगळं लढायला सागितले तर तेही करु, असे म्हस्के म्हणाले**

### मतदारांना प्रत्यक्ष जाऊन भेटण्याचा प्रयत्न

नवी मुंबईचा जो मतदार आहे, त्याला त्याला प्रत्यक्ष भेटणे, नागरिकांचे प्रश्न सोडवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. ही कुठलीही स्पर्धा नाही. जनता दरबार वगैरेला हे उत्तर तर अजिबात नाही, असे खासदार म्हस्के यांनी यावेळी स्पष्ट केले. या ठिकाणचा मी खासदार आहे आणि पंधरवड्यात एकदा येथील रहिवाशांना भेटावे, त्यांचे प्रश्न समजून घ्यावेत ही माझी सुद्धा इच्छा होती. लोक त्यांच्या समस्या घेऊन ठाण्यात येत असतात. त्या तिथेही सोडवण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करत असतो. परंतु मतदारसंघातील वेगवेगळ्या शहरांमध्ये प्रत्यक्ष जाऊन भेटण्याचा हा प्रयत्न आहे, असे म्हस्के यांनी यावेळी सांगितले.

# न्यायालयात काळा कोट परिधानास वकीलांना सूट ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तापमानात चांगलीच वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिक काळे कपडे घालणे टाळताना दिसत आहेत. पण वकीलांना मात्र न्यायालयात काळा कोट घालणे बंधनकारक असते. उन्हाळ्याच्या दिवसात या कोटमुळे वकीलांना उष्णतेचा सामना करावा लागतो यादरम्यान वाढते तापमान लक्षात घेऊन महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने (बीसीएमजी) वकिलांना दरवर्षी १ मार्च ते ३० जून या कालावधीत काळा कोट परिधान करण्याची गरज नसल्याचा निर्णय घेतला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे वकीलांना त्यांच्या ठरवून दिलेल्या ‘ड्रेस कोड’मधून मिळणारी सूट यापूर्वी फक्त मे ते जून या उन्हाळ्याच्या दिवसांमध्येच दिली जात होती. मात्र ही सूट आता १ मार्चपासून सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने याबद्दलचे परिपत्रक २७ फेब्रुवारी रोजी जारी केले आहे. यामध्ये दरवर्षी १ मार्च ते ३० जून पर्यंत ही सूट वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. बार अँड बेंचने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या परिपत्रकात असे लिहिले आहे की, “पोशाख नियमांसाठी उन्हाळी महिन्यांचा अर्थ १ मार्च ते ३० जून दरम्यानचे महिने असा असेल. त्यानुसार, दरवर्षी १ मार्च ते ३० जून दरम्यान वकिलांना काळे कोट/जॅकेट घालण्यापासून सूट दिली जाईल.”



# बोईसर बस स्थानकाची सुरक्षा वाऱ्यावर !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर :** राज्य परिवहन महामंडळाच्या पुण्यातील स्वारगेट एसटी बस स्थानकात प्रवासी महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने राज्यभर खळबळ माजली आहे. या घटनेनंतर प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील एसटीच्या आठ स्थानकांची पाहणी केली असता येथे सुरक्षेच्या दृष्टीने अनेक त्रुटी दिसून येत आहेत. बस स्थानक आवारातील बेकायदा पार्किंग आणि गैरप्रकार बंद करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभाग अंतर्गत पालघर, बोईसर, डहाणू, जव्हार, सफाळे, अर्नाळा, नालासोपारा आणि वसई या आठ एसटी आगारांचा समावेश होतो. पालघर विभागासाठी एक सुरक्षा व दक्षता अधिकारी नियुक्त असून त्यांच्या अधिपत्याखाली या आठ आगारांमधील सुरक्षेवर नियंत्रण ठेवले जात आहे. पालघर विभागीय कार्यालय आणि कार्यशाळेसह एकूण ४४ सुरक्षारक्षकांवर येथील सुरक्षेची जबाबदारी आहे. मात्र बहुतेक सर्व बस स्थानकांमध्ये प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येते.

पालघर विभागातील बोईसर हे सर्वाधिक वर्दळीचे बस स्थानक म्हणून ओळखले जात असून आगारातून लांब पल्ल्याच्या आणि स्थानिक अशा दैनंदिन एकूण ४७५ फेऱ्या चालविल्या जातात. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये काम करणारा कामगार वर्ग, मुंबई आणि वसई-विरार भागात कामानिमित्त ये-जा करणारे कामगार तसेच ग्रामीण भागातील नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात एसटी सेवेवर अवलंबून आहेत. पहाटे सहापासून रात्री उशिरा शेवटच्या उपनगरी गाडीच्या वेळेपर्यंत एसटी सेवा कार्यरत असते.

बोईसर एसटी स्थानकातील सुरक्षा व्यवस्थेत अनेक त्रुटी असून त्यांवर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. बसस्थानक तारापूर रस्त्यालगत असल्याने परिसरात खासगी दुचाकी, चारचाकी आणि रिक्षा यांसारख्या प्रवासी वाहनांची दिवसरात्र मोठी वर्दळ सुरू असते. रिक्षा, इकोसारखी प्रवासी वाहने पालघर, मनोर, तारापूर, मुरबे, दांडी या



मार्गावर धावणाऱ्या बसच्या प्रतीक्षेत असलेले प्रवासी मिळविण्यासाठी बस स्थानकाच्या आतपर्यंत घुसखोरी करीत असतात. बोईसर एसटी स्थानकाच्या काँक्रीटीकरणाचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले असले तरी पश्चिम बाजूला संरक्षण भिंत नसल्याने तसेच कार्यशाळेच्या मागील भिंत पावसामुळे कोसळल्याने अनेक जण बेकायदा प्रवेश करतात. बस स्थानक आणि कार्यशाळेच्या दरम्यान असलेल्या निर्जन भागात झाडी झुडपे असून या ठिकाणी रात्रीच्या सुमारास प्रेमीयुगुले, मद्यापान, धूम्रपान आणि अमलीपदार्थ सेवन करणारे, भुरटे चोर आणि गर्दुल्ले यांचा वावर असतो. एस टी स्थानकात गैरप्रकार करणाऱ्यांचा नित्यनेमाने वावर सुरू असल्याने रात्रीच्या सुमारास बसच्या प्रतीक्षेत असलेले प्रवासी विशेषत: महिला प्रवासी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. गैरधंदे करणाऱ्यांच्या समोर सुरक्षेसाठी तैनात असलेले सुरक्षारक्षकदेखील हतबल होताना दिसतात. बसस्थानक परिसरात पोलिसांची रात्रीची गस्त सुरू असते, मात्र यामध्ये सातत्य नसल्याने सुरक्षा योजना कुचकामी ठरत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

> **पुण्यातील घटनेनंतर राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभाग अंतर्गत सर्व बस आगारांमध्ये वरिष्ठांच्या सुचनेनुसार सुरक्षेचा आढावा घेण्यात येत असून यामध्ये काही त्रुटी असतील तर त्यात निश्चित सुधारणा करण्यात येतील.**
>
> **– कैलास पाटील, विभागीय नियंत्रक, पालघर विभाग**

### रिक्षाचालकांची घुसखोरी

पालघर बस स्थानकामध्ये रात्रीच्या सुमारास बाहेरगावावरून आलेल्या लांबपल्ल्याच्या बसमधील प्रवासी घेण्यासाठी काही रिक्षाचालक स्थानकाच्या आतपर्यंत घुसखोरी करतात. प्रवासी मिळवण्यासाठी अनेक वेळा काही रिक्षाचालकांमध्येच आपापसात वाद होण्याचे प्रकार घडत असतात. पालघर बस स्थानक परिसरात खासगी वाहनांची बेकायदा पार्किंग त्याचप्रमाणे टपोरी तरुणांचा वावर महिला प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात आढावा बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
मुंबई : महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महामंडळाच्या कामाची व्याप्ती वाढविण्यात यावी. बचतगटांमार्फत जन सुविधा केंद्रांची देखभाल करण्याबाबत तसेच सर्व्हिस सेक्टरमध्ये रोजगाराच्या जास्तीत-जास्त संधी उपलब्ध करून देणे व शहरी भागातील महिलांना आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठीच्या योजनांसंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, माविमच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा, विभागाचे सहसचिव श्री. ठाकूर, 'माविम'चे सहायक व्यवस्थापक श्री. गमरे, सल्लागार कुसूम बाळसराफ आदिसह अधिकारी उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे म्हणाल्या की, महामार्गावरील जनसुविधा केंद्राच्या देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी महिला बचतगटांना देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा. या सुविधा केंद्रांमध्ये शौचालये, हिरकणी कक्ष, बचतगटातील व ग्रामीण भागातील महिलांसाठी प्रदर्शन, हस्तकला विक्री केंद्रे, अल्पोपहार यासारखे स्टॉल उभारण्याचे प्रस्तावित करावे.बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्बल घटकातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम माविम मार्फत सुरू असून, ग्रामीण आणि शहरी भागातील सुशिक्षित आणि मध्यमवर्गीय महिलांसाठी व्यावसायिक संधी, वित्तिय जोडणी आणि मार्गदर्शन प्रभावीपणे करण्यासाठी पंडिता रमाबाई वैयक्तिक महिला अर्थार्जन योजना राबविण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही यावेळी तटकरे यांनी दिले.

# मीरा -भाईदर नवी ओळख MH-58

### मंत्री, प्रताप सरनाईक यांची मीरा-भाईदरच्या नागरिकांना गोड भेट..

### उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास शासनाची मंजुरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मीरा -भाईंदर : 1 मार्च हा परिवहन विभागाचा (RTO ) स्थापना दिवस " परिवहन दिन " म्हणून साजरा केला जातो. त्याच्या पूर्वसंध्याला परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी मीरा-भाईंदर येथील रहिवाशांसाठी " गुड न्यूज " दिली आहे. राज्यातील 58 वे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मीरा-भाईंदर येथे मंजूर करण्यात आले आहे. त्या संदर्भातला शासन निर्णय आज शासनाने जाहीर केला आहे.




लोकप्रतिनिधी म्हणून सन 2009 पासून मीरा-भाईंदर येथील रहिवाशांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्न मुळे मीरा-भाईंदर येथे परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होत आहे. उत्तन येथील शासनाकडून अधिग्रहित केलेल्या जमिनीवर हे प्रशस्त कार्यालय भविष्यात उभे राहील त्याचबरोबर 8 मार्चला महिला दिनाचे औचित्य साधून दिवाणी न्यायालयाच्या इमारतीचं उद्घाटन देखील सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओके यांच्या हस्ते संपन्न होत आहे. याबरोबरच भविष्यात पोलीस आयुक्तालयाचे देखील कार्यालय या परिसरात निर्माण होईल, असा विश्वास मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केला आहे. मीरा-भाईंदर येथील वाढती लोकसंख्या आणि त्या प्रमाणात वाढणारी वाहनधारकांची संख्या लक्षात घेता शासनाने येथे 58 वे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याचा निर्णय आज जारी केला .कित्येक वर्ष यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून मंत्री प्रताप सरनाईक हे या साठी प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नाला अखेर यश आले आहे. याबरोबरच लवकरच मीरा-भाईंदर येथे दिवाणी न्यायालयाचे इमारतीचे उद्घाटन होत आहे. भविष्यात पोलीस आयुक्तालय देखील मीरा -भाईंदर साठी निर्माण करण्याचे आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिले आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी शून्य कार्बन उत्सर्जन हवे

**– माहिती तंत्रज्ञान मंत्री, ॲड. आशिष शेलार**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
मुंबई :सक्षम'SAKSHAM-2024-25' हरित आणि स्वच्छ ऊर्जेद्वारे स्वच्छ वातावरण हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वापरावर भर द्यावा. तसेच कमी कार्बन उत्सर्जन करणाऱ्या पर्यावरण पूरक व्यवस्थेचा वापर करावा. असे आवाहन माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार यांनी केले.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राज्यस्तरीय समन्वयक, महाराष्ट्र पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू उद्योग यांच्या वतीने सक्षम 'SAKSHAM-2024-25' हरित आणि स्वच्छ ऊर्जेद्वारे स्वच्छ वातावरण कार्यक्रम झाला. यावेळी, पश्चिम क्षेत्र हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे जनरल मॅनेजर बी.अच्युत कुमार, बीपीसीएलचे महाराष्ट्र आणि गोवाचे महासंचालक अशिष राय, इंडियन



ऑइल चे जनरल मॅनेजर अभिजीत एस गिते, गेल इंडियाचे उप जनरल मॅनेजर अनुराग भार्गव, इंडियन ऑइल चे राज्य तेल समन्वयक उमेश कुलकर्णी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार म्हणाले, आपल्याला दुसऱ्या देशातून खनिज तेल आयात करावे लागते. वाहतूक खर्च वाढल्यामुळे ते अधिक महागते. गॅसवर चालणाऱ्या रिक्षा, टॅक्सी यासारख्या वाहनांतून कार्बनचे उत्सर्जन कमी होते. कार्बन उत्सर्जन कमी झाल्यास वातावणारमध्ये ऑक्सीजनचे प्रमाण योग्य राहील. त्यामुळे आपली सर्वांची प्रकृती चांगली राहिल. सक्षम कार्यक्रम हा आपल्या कुटुंबाला, देशाला सक्षम करणारा पर्यावरण रक्षणाचा कार्यक्रम आहे. कार्बन उत्र्सजन कमी करण्यावर सर्वांनी भर द्यावा असे आवाहनही ॲड.शेलार यांनी केले.यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड शेलार यांच्या हस्ते शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी इंधन आणि तेल संवर्धनाकरिता आयोजित गट चर्चा, वादविवाद स्पर्धेतील विजेत्यांना तसेच शिक्षकांना त्यांच्या उत्कृष्ट योगादानाबद्दल पुरस्कृत करण्यात आले. सक्षम (संरक्षण क्षमता महोत्सव) 2024-25 हा उपक्रम दि.14 ते 28 फेब्रुवारी, 2025 दरम्यान संपूर्ण देशभरात आयोजित केला गेला. या कार्यक्रमाचे घोषवाक्य हरित आणि स्वच्छ अंगिकार करा आणि पर्यावरणास स्वच्छ बनवा हे होते. सक्षम मोहिमेदरम्यान यंत्रणा ओएमसी, शालेय मुले, तरूण, एलपीजी वापरकर्ते, ड्रायव्हर्स, फ्लीट ऑपरेटर, उद्योग कर्मचारी, कामगार, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था पर्यंत पोहोचला. तसेच इंधन संवर्धनाचे महत्त्व, फायदे आणि पद्धतीबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि इंधन-कार्यक्रम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबविण्यात आले.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा, वादविवाद महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी, भिंतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, वर्तमानपत्रात लेख, पत्रकार परिषदा आणि टीव्ही/रेडिओवरील टॉक शो, वॉकेथान आणि सायक्लोथॉन, एलपीजीच्या कार्यक्षम आणि सुरक्षित वापराला प्रोत्साहन देणे, शेतकरी, ऑपरेटर, सार्वजनिक क्षेत्रातील कॉर्पोरेट कार्यालये, संस्था/एनजीओ इत्यादीसाठी कार्यशाळा आणि कार्यक्रम, सीएनजी रॅली राबविण्यात आले. इंधन संवर्धनासाठी विविध माध्यमातून महाराष्ट्रभर 500 उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**संक्षिप्त**

## मनसेच्या पाठपुराव्याने कारंजे सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण मधील काळा तलाव येथील आतील बाजूस असलेले लेझर शो व कारंजे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद होते. त्याकरिता मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार आणि शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांनी केडीएमसी आयुक्त व विद्युत विभाग अधिकाऱ्यांना पत्राद्वारे, फोन द्वारा तसेच प्रत्यक्षात भेटून निवेदन देण्यात आले होते.

हा विषय लक्षात घेऊन गेल्या दोन दिवसांपूर्वी अधिकारी यांच्या कार्यालयात चर्चा केल्यानंतर काळा तलावाच्या आतील बाजूस असलेले लेझर शो व कारंजे सुरू करुन घेण्यात आले आहे. त्याबद्दल आयुक्त , स्मार्ट सिटी अभियंता तांबे, विद्युत विभागचे उप अभियंता भागवत पाटील, चंद्रकांत पोळ यांचे मनसेने आभार मानले आहेत.





## श्री गजानन विद्यालयात मातृ पितृ दिन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : शालेय अभ्यासक्रमाबरोबरच संस्कार व मूल्ये ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. आयुष्यात संस्कारांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चांगले संस्कार आपल्याला उत्तम नागरिक बनविण्यासाठी अत्यंत मोलाचे काम करतात. आणि हेच काम कल्याण मधील श्री गजानन विद्यालय येथे केले जात आहे.

ह्याच संस्काराचा एक भाग म्हणजे मातृ पितृ पूजन.

मातृ पितृ दिनानिमित्त शाळेत इयत्ता तिसरी व चौथीच्या पालकांना आमंत्रित करून मातृ-पितृ पूजन सोहळयाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे पूजन केले, आरती केली, पालकांना प्रदक्षिणा घातली, साष्टांग नमस्कार केला. पालकांनीही आपल्या पाल्याला भरभरून आशीर्वाद दिला. कार्यक्रम अतिशय भावनात्मक झाला. प्रत्येक मूल व पालक यांच्या डोळयात आनंदाश्रू दिसत होते. हा प्रसंग खरोखर सर्वांना भारावून टाकणारा होता.

विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांचे आपल्या जीवनातील महत्त्व सांगितले. आपली संस्कृती जपणारी व विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडविणारी कल्याणातील एकमेव शाळा म्हणजे श्री गजानन विद्यालय आहे अशी प्रतिक्रिया उपस्थित पालकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली. शाळेने सुंदर उपक्रम राबविल्याबद्दल पालकांनी शाळेचे आभार मानले.

# प्राथमिक शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा मार्ग मोकळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन आंतर जिल्हा बदलीची सुरुवात सन 2017 सालापासून झाली. तेव्हापासून आतापर्यंत आंतरजिल्हा बदलीचे एकूण सहा टप्पे पूर्ण झाले आहेत. शिक्षकांच्या अंतर जिल्हा बदली प्रक्रियेमधील होणारा भ्रष्टाचार व वर्षानुवर्षी लालफितीत अडकणारी प्रक्रिया ऑनलाइन बदली धोरणामुळे थांबली. दरवर्षी माहे एप्रिल /मे महिन्यामध्ये बदली इच्छुक शिक्षकांना आपल्या स्वजिल्ह्यात बदलीने जाण्याचे वेध लागतात.वेगवेगळया जिल्ह्यात कार्यरत पती-पत्नी यांच्या कौटुंबिक जीवनात स्थैर्य आणण्याचे काम या आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून होते. विशिष्ट कालावधी पूर्ण केल्यानंतर शिक्षकांना बदलीपात्र म्हणून समजले जाते. बदलीच्या माध्यमातून विधवा, कुमारिका, घटस्फोटीत-महिला शिक्षिकांना स्व-जिल्ह्यात जाता येते. वर्षानुवर्षे इतर जिल्ह्यातील सेवा केल्यानंतर स्वजिल्ह्यात बदली हा जिव्हाळयाचा प्रश्न असतो. परंतु आंतरजिल्हा बदलीच्या सातव्या टप्प्यात मध्यंतरीची लोकसभा व विधानसभा निवडणूक व



त्या अनुषंगाने आलेली आचारसंहिता यामुळे खंड पडला होता. यामुळे आंतरजिल्हा बदली इच्छुक शिक्षकांमध्ये थोडीशी धाकधूक पाहायला मिळाली परंतु राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने याबाबत ग्राम विकास विभागाच्या मंत्री महोदयांची यांची भेट घेऊन त्यांचे ओएसडी नारायण गोरे यांना याबाबतची निवड लक्षात आणून दिली. याचबरोबर महाराष्ट्रातील विविध आमदाराचे पत्रही ग्रामविकास विभागाला प्राप्त झाले.याची दखल घेऊन सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना १० मार्च ते ६ एप्रिल २०२५ पर्यंत आंतरजिल्हा बदलीच्या करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक शासनाकडून देण्यात आले आहे.. शासनाच्या या निर्णयाचे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून बदली इच्छुक शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

**करावयाची कार्यवाही व त्यासाठी कालावधी**

1) शिक्षकाची माहिती पोर्टलवर अद्यावत करणे -- 10 मार्च 2025 पर्यत.
2) जि.प.ने बिंदू नामावल्या तपासून घेणे व पोर्टलवर रिक्त पदांची माहिती अपलोड करणे --11 मार्च ते 13 मार्च 2025 पर्यत.
3) शिक्षकांना अर्ज भरण्याची सुविधा-- 14 मार्च ते 20 मार्च 2025 पर्यत.
4) अर्जाची पडताळणी-- 21 मार्च ते 25 मार्च 2025 पर्यंत.
5) न्यायालयीन प्रकरणे विभागीय आयुक्त अपील प्रकरणी तपासणी -- 26 मार्च ते 27 मार्च 2025 पर्यंत.
6) आंतर जिल्हा बदली प्रक्रिया पूर्ण करणे --28 मार्च ते 6 एप्रिल 2025 पर्यंत.

सर्व बदली इच्छुक शिक्षकांच्या बदल्या होण्यासाठी जिल्हावार रिक्त पदांची माहिती प्रत्येक जिल्हा परिषदेने अचूक कळविणे आवश्यक आहे ..त्याचबरोबर जिल्हानिहाय रोष्टर अपूर्ण असल्याने काही जिल्ह्यातील बदली प्रक्रिया पूर्ण होत नाही त्यासाठी राज्य रोष्टर हा एकमेव पर्याय संघटनेसमोर आहे. भविष्यात त्यासाठी मोठा लढा उभारावा लागणार आहे. त्याचबरोबर काही जिल्हा परिषदा बदली होऊनही सदर शिक्षकांना कार्यमुक्त करत नाहीत त्याबाबत ही ठोस धोरण शासनाने अवलंबिन्याची गरज आहे .

**– अनिल नाचपले, प्रदेशाध्यक्ष, बहुजन शिक्षक महासंघ**

# वैशाखरे गावातील हनुमान मंदिर जिर्णोध्दार सोहळ्यास प्रारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : मुरबाड तालुक्यातील वैशाखरे गावातील हनुमान मंदिच्या जिर्णोद्धार सोहळयाला शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५रोजी उत्साहात प्रारंभ झाला.

सकाळीं हनुमंताच्या मुर्तीची टाळ मृदंगाच्या निनादात ग्राम प्रदक्षिणा करण्यात आली त्यानंतर मुर्ती गंगास्नानासह कलशपुजन करण्यात आले यावेळी वैशाखरे गावातील तसेच परिसरातील हनुमान भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. संध्याकाळी वैशाखरे ग्रामस्थ मंडळाने हरीपाठाची सेवा केली तर रात्री ९ ते ११ पर्यंत श्री क्षेत्र नासीक येथील ह .भ.प. भगीरथ महाराज यांच्या सुश्राव्य आशा किर्तनरुपी सेवेचा लाभ झाला वैशिष्ट्य म्हणजे गावातील सर्वधर्मीय महिला, पुरुष तसेच तरुण, तरुणींनी मोठ्या प्रमाणात संबंधित कार्यक्रमात सहभाग दर्शविल्याने संपूर्ण परीसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.



## पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलाचे उद्घाटन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे नूतनीकृत संकुल उद्या, रविवार, दि. 2 मार्च 2025 रोजी सायंकाळी 6.00 वाजता उद्घाटनासाठी सज्ज झाले आहे. हा उद्घाटन समारंभ रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे आयोजित करण्यात आला आहे.उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राहणार असून, त्यांच्या शुभहस्ते या संकुलाचे लोकार्पण होणार आहे. तसेच, या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, मुंबई शहर एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार, कौशल, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, खासदार अनिल देसाई आणि आमदार महेश सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमानिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये संजय मोने, पुष्कर श्रोत्री, सुभाष नकाशे, नंदेश उमप, रोहन पाटील व अन्य कलाकारांचा समावेश आहे.

# दहा वर्षे प्रेमात राहून दुसरीशी लग्न

## विडिओ बनवत महिलेची आत्महत्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : तुझ्याशी लग्न करेन, तू खूप आवडते, माझे तूझ्यावर जीवापाड प्रेम आहे, आदी विविध भूलथापांना देऊन गेली.१०वर्षे शारीरिक संबंध प्रस्थापित करून अचानक दुसरीशी लग्न केल्यामुळे आपली फसवणूक झाली, आपले आयुष्य बरबाद केले या रागातून विडिओ बनवत सुमन मच्छिंद्र शेंडगे या महिलेने राहत्या घरी ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली, पोलिसांनी तात्काळ आरोपी सचिन शास्त्री याला अटक केली आहे, इ तर आरोपी अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका महिलेच्या नातेवाईकांनी घेतली आहे ,परंतु उर्वरित आरोपींना लवकर पकडण्यात येईल असे म्हारळ पोलीस चौकीचे पोलीस इन्स्पेक्टर श्री जाधव यांनी सांगितले, म्हारळ गावात राहणाऱ्या सुमन मच्छिंद्र शेंडगे हिचे आणि सचिन शास्त्री यांचे गेल्या १०वर्षापासून प्रेम प्रकरण चाल होते, या दरम्यान दोघा मध्ये अनेक वेळा शारिरीक संबंध आले होते, सुमन जेव्हा जेव्हा सचिन शास्त्री याला लग्नाविषयी विचारत होती तेव्हा प्रत्येक वेळी तो काहीतरी सांगून वेळ मारून नेत होता, मात्र सचिन ने अचानक गायत्री हिच्याशी ५वर्षांपूर्वी लग्न केले, त्यामुळे सचिन शास्त्री, रवी शास्त्री, गायत्री शास्त्री, सचिन ची सासू, बहिण, मावशी हे सुमन ला शारीरिक, मानसिक त्रास देत होते, अखेरीस आपले आयुष्य बरबाद झाले, याला हेच लोक जबाबदार आहेत असा विडिओ बनवत सुमन शेंडगे हिणे राहत्या घरी ओढणीने गळफास लावून आत्महत्या केली, हा विडिओ व्हायरल झाला, त्यामुळे टिटवाळा पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी सचिन शास्त्री यांच्या मुसक्या आवळल्या मात्र इतर आरोपी अटक होत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका सुमन शेंडगे हिच्या नातेवाईकांनी घेतली आहे.



### आरोपीला अटक, म्हारळ मधील घटना, इतर आरोपींना लवकर पकडणार

याबाबत म्हारळ पोलीस चौकीचे पोलीस इन्स्पेक्टर श्री जाधव यांना विचारलं असता उर्वरित आरोपी ना लवकरच अटक करण्यात येईल असे सांगितलं, तथापि म्हारळ परिसरात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली असून या गावाची लोकसंख्या५०हजार ते १लाखांच्या आसपास गेली आहे, परंतु यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी मात्र अत्यल्प असल्याने त्यांच्या वर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण पडतो आहे, येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन व्हावे अशी गेल्या कित्येक वर्षांपासून ची मागणी आहे, मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024